जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ६२० दिनांक - १४/०८/२०२३

### पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर

### कोंढवा व समर्थ पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या,अट्टल गुन्हेगारावर मा. पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये ४० वी स्थानबध्दतेची कारवाई

पुणे पोलीस आयुक्तालयातील कोंढवा व समर्थ पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **वसीम उर्फ लाल रशीद हजारी,वय-३९ वर्षे,रा.सारा अपार्टमेंट,फ्लॅट नं.०५,साईबाबानगर, अमर रेसिडेन्सी,कोंढवा-खुर्द,पुणे व रा.घर नं.५४/५५,एच.पी.लोहीयानगर,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने त्याच्या साथीदारांसह समर्थ,कोंढवा,खडक,वानवडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत कोयता, पिस्टल या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह **खुनाचा प्रयत्न,दरोडा,जबरी चोरी,विनयभंग,घातक शस्त्राने दुखापत करणे, बेकायदेशीर शस्त्र व अग्नीशस्त्र बाळगणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०८ गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती.तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए.कायद्यान्वये नागपूर मध्यवर्ती कारागृह,नागपूर येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले** आहेत.नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक,कोंढवा पोलीस स्टेशन पुणे,श्री.संतोष सोनवणे व पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर,श्री.आनंदराव खोबरे यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणा�या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही ४० वी कारवाई असून,**यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.